# पुणे महानगरपालिका
# वृक्ष प्राधिकरण

## • जाहिर प्रकटन •

## (पुणे महानगरपालिका हद्दीकरिता)

- पुणे महानगरपालिका अधिकार क्षेत्रास महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चा कायदा लागू करण्यात आला आहे.
- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्षसंरक्षण व संवर्धन नियम २००९ व मे.उच्च न्यायालय,मुंबई यांचे दिनांक २० सप्टेंबर २०१३ रोजीच्या आदेश व महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम,२०२१ नुसार वृक्ष प्राधिकरणाचे कामकाज करण्यात येते.
- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील **प्रकरण पाच कलम ८ (१)** – ''**कोणत्याही नागरी क्षेत्रात हा अधिनियम अंमलात आणल्याच्या दिनांकाला व त्या दिनांकानंतर त्यावेळी अंमलात असलेली कोणतीही रूढी,परिपाठ,करार किंवा कायदा यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणीही व्यक्ति वृक्ष अधिकाऱ्यांच्या पूर्व–परवानगीखेरीज त्या नागरी क्षेत्रातील कोणत्याही, तिच्या स्वत:च्या मालकीच्या किंवा अन्य जमिनीतील झाड तोडणार नाही किंवा तोडण्यास कारणीभूत होणार नाही.**'' असे नमूद केलेले आहे.
- महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम,२०२१ मधील कलम ८ नुसार –''**या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून जी व्यक्ति कोणतेही झाड तोडील किंवा कोणतेही झाड तोडण्यास कारणीभूत होईल किंवा वृक्ष अधिकाऱ्याने किंवा वृक्ष प्राधिकरणाने लादलेल्या शर्तीचे किंवा दिलेल्या आदेशांचे पाल करण्यात वाजवी सबबीशिवाय कसूर करील किंवा वृक्ष प्राधिकरणाच्या कोणत्याही सदस्यास किंवा वृक्ष अधिकाऱ्यास किंवा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास या अधिनियमाखालील त्यांची कर्तव्ये पार पाडण्यात स्वेच्छेने अडथळा आणील त्या व्यक्तीला अपराधसिध्दीनंतर , प्रत्येक अपराधाकरिता शासनाद्वारे अधिसुचित करण्यात येईल अशा पध्दतीचा वापर करून, काढलेल्या झाडाच्या मुल्याइतके परंतू, एक लाख रूपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेच्या आणि एक आठवड्यापेक्षा कमी नसेल व एक वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाचीदेखील शिक्षा होईल.**'' असे नमूद केलेले आहे.
- विकसनाच्या कामास अडथळा करणारी वृक्ष , आरोग्य व जीवितास धोका असणारी वृक्ष अथवा अन्य कोणतेही वृक्ष तोडावयाची असल्यास अथवा विस्तार/फांद्या कमी करणेचे झाल्यास मा.अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण /वृक्ष प्राधिकरण समिती/मा.वृक्ष अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्षसंरक्षण व संवर्धन नियम २००९ व मे.उच्च न्यायालय,मुंबई यांचे दिनांक २० सप्टेंबर २०१३ रोजीच्या आदेशान्वये, पुणे महानगरपालिका हद्दीमधील वृक्षांच्या फांद्या छाटणे/विस्तार कमी करणे,धोकादायक वृक्ष,बांधकामास अड्थळा करणारे वृक्ष पुर्ण काढणे/पुनर्रोपण करणे,बांधकामास पुर्णत्वाचा दाखला घेणे व बांधकाम पुर्व ना हरकत पत्र घेणेसाठी प्रस्तावासोबत खालील कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.
- महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग अधिसुचना क्र.पीएमसी–२०२०/प्र.क्र.३२२/नवि–२२,दिनांक – ३०/६/२०२१ अन्वये, पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने २३ गावांचा समावेश झालेला आहे. सबब, यापुर्वी व सदर अधिसुचनेनुसार समाविष्ठ करण्यात आलेल्या गावांमधील (पुणे महानगरपालिका हद्दीमधील) वृक्षांच्या फांद्या छाटणे/विस्तार कमी करणे,धोकादायक वृक्ष,बांधकामास अड्थळा करणारे वृक्ष पुर्ण काढणे/पुनर्रोपण करणे,बांधकामास पुर्णत्वाचा दाखला घेणे व बांधकाम पुर्व ना हरकत पत्र घेणेसाठी प्रस्ताव संबंधित विभागाचे मा.महापालिका सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,पुणे महानगरपालिका यांचेकडे सादर करावयाचा आहे.
- सदर प्रस्तावांबाबतची माहिती पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर Tree Authority या विभागामध्ये Key Documents या शिर्षकाखाली डाऊनलोड करता येतील, अशा स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | वृक्ष प्राधिकरणाकडे करावयाचे अर्ज | अर्जासोबत आवश्यक असणारे कागदपत्रे |
|---|---|---|
| १) | वृक्षांच्या फांद्या छाटणीबाबत परवानगीपत्र | १) अर्ज<br>२) प्रत्येक वृक्षांच्या धोकादायक असणाऱ्या फांद्याचे स्वतंत्र व सुस्पष्ट रंगीत फोटो<br>३) वृक्षांच्या फक्त धोकादायक फांद्या परवानगीपत्राप्रमाणे काढणार असल्याबाबतचे हमीपत्र |
| २) | मिळकतीमधील बांधकाम नकाशा मान्य करणेसाठी, बांधकाम पुर्व ना हरकत दाखला घेणे | १) अर्ज<br>२) संबंधित वास्तू विशारदाची स्वाक्षरी असलेल्या मान्य होण्या पुर्वीच्या नकाशावर, मिळकतीवर अस्तित्वात असणारे वृक्षांचे हिरव्या रंगाने ट्रेसिंग करून लोकेशन दाखविणे.<br>३) संबंधित वास्तू विशारदाची स्वाक्षरी असलेल्या मान्य होण्या पुर्वीच्या नकाशावर, भविष्यात लावणेत येणाऱ्या वृक्षांचे निळ्या रंगाने ट्रेसिंग करून लोकेशन दाखविणे<br>४) मिळकतीवर अस्तित्वात असलेल्या प्रत्येक वृक्षांचा स्वतंत्र व सुस्पष्ट रंगीत फोटो<br>५) संबंधित जागेच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रांच्या प्रती. |

| | | |
|---|---|---|
| ३) | १) प्रत्यक्ष बांधकामास अडथळा करणारे वृक्ष काढणे/वृक्षांचे पुनर्रोपण करणे.<br><br>२) बांधकामास अडथळा करणाऱ्या वृक्षांच्या फांद्या छाटणी करणे. | १) विहित नमून्यातील अर्ज – प्रपत्र –''सी''<br>२) विहित नमून्यातील हमीपत्र – प्रपत्र –''डी''<br>३) बांधकाम पुर्व ना हरकत दाखलाची प्रत.<br>४) बांधकाम चालू करणेचा दाखला (कमिन्समेंट सर्टीफिकेट)<br>५) मनपा मान्य नकाशा (ब्ल्यु प्रिंट) व त्यावर ट्रेसिंग करून तोडावयाचे वृक्ष लाल रंगाने दाखविणे व उर्वरित वृक्ष हिरव्या रंगाने दाखविणे.<br>६) तोडावयाच्या वृक्षांच्या बदल्यात (१:३ प्रमाणात) करावयाच्या नविन वृक्ष लागवड व पुनर्रोपण करणारे वृक्षांचे ठिकाण निळ्या रंगाने दाखविणे.<br>७) तोडावयाचे प्रत्येक वृक्षांचे स्वतंत्र व सुस्पष्ट वृक्ष क्रमांकासह रंगीत फोटो<br>८) संबंधित जागेच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे.<br>९) मे.उच्च न्यायालय,मुंबई यांचे दिनांक २० सप्टेंबर २०१३ रोजीच्या आदेशामधील ANNEXURE-II प्रमाणे हमीपत्र.<br>१०) सदर ठिकाणच्या मिळकतीवरील वृक्ष न काढता बांधकाम करणे अडचणीचे असल्याबाबतचे संबंधित वास्तुविशारदाचे प्रमाणपत्र. |
| ४) | बांधकामासाठी अडथळा करणारे वृक्ष काढणे/पुनर्रोपण करणेच्या बदल्यात करावयाच्या नविन वृक्ष लागवड व संवर्धनापोटी भरलेली अनामत रक्कमेची मागणी करणे | १) अर्ज<br>२) अनामत भरलेल्या रक्कमेची मुळ चलन पावती<br>३) मनपा मान्य नकाशावर (ब्ल्यु प्रिंट) संवर्धन करण्यात आलेल्या वृक्षांचे हिरव्या रंगाने लोकेशन दाखविणे<br>४) अनामत रक्कम ज्या कारणास्तव भरलेली आहे,त्या दाखला किंवा परवानगीपत्राची प्रत. |
| ५) | बांधकामासाठी पुर्णत्वाचा दाखला मिळणेबाबत. | १) अर्ज<br>२) बांधकाम पुर्व ना हरकत दाखलाची प्रत.<br>३) बांधकाम चालू करणेचा दाखला (कमिन्समेंट सर्टीफिकेट)<br>४) मनपा मान्य नकाशावर (ब्ल्यु प्रिंट) मिळकतीमध्ये केलेल्या प्रत्येक वृक्षांचे स्वतंत्र व सुस्पष्ट रंगीत फोटो<br>५) पुर्वी वृक्ष काढणे/पुनर्रोपण करणेस परवानगी घेतलेली असल्यास,परवानगीपत्राची प्रत<br>६) वृक्षतोडीच्या बदल्यात नविन वृक्ष लागवड (१:३ प्रमाणात) केलेली असणे आवश्यक आहे.<br>७) संबंधित मिळकतीच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे. |

| | | |
|---|---|---|
| ६) | जाहिरात फलक उभारणेसाठी ना हरकत पत्र देणे | १) अर्ज<br>२) संबंधित जागेचा सुस्पष्ट रंगीत फोटो<br>३) वृक्षांना इजा होणार नसल्याबाबतचे हमीपत्र तसेच जागामालकाचे ना हरकत पत्र<br>४) स्टॅबिलिटी प्रमाणपत्र<br>५) स्ट्रक्चर नकाशा (Structure map)<br>६) जागेचा नकाशा |

तरी,उपरोक्त बाबींची नोंद घेण्यात यावी.

टिप :- उपरोक्त प्रमाणे संपुर्ण कागदपत्रांसह प्रस्ताव वृक्ष प्राधिकरणाकडे सादर करणे आवश्यक आहे. अपुर्ण कागदपत्रांचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

**(अशोक घोरपडे)**
**मुख्य उद्यान अधिक्षक**
**तथा सदस्य सचिव,वृक्ष प्राधिकरण**
**पुणे महानगरपालिका**